# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०५/०९/२०१६

**१) जीपची मोटार सायकलला धडक धडकेत एकाचा मृत्यु तर दुसरा गंभिर जखमी . :–**

दिनांक 02/09/2016 रोजी 11.30 वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील जिप गाडी भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन राजापुर कडुन येणा–या मोटार सायकलला आमोरासमोर राजापुर ते नाकाडोंगरी येथे धडक मारुन मोटार सायकल चालक व त्याचे सोबत बसणा–या इसम यांना गंभिर दुखापत झाल्याने उपचारा दरम्यान मोटार सायकल चालक किसन दशरथ ढोमने वय 40 वर्ष, रा. पाथरी हा मरण पावला व त्याचे सोबत असलेला इसम दिपक रोकडे वय 39 वर्ष, रा. कंटगी याचे उपचार सुरु असुन डॉ. मेमो वरुन पो. स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. 00/16 क. 174 जाफौ चे कागदपत्र दि. 03/09/2016 ला पो.स्टे. गोबरवाही येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा वानखेडे पो. स्टे.गोबरवाही याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम 279,337,338,304(अ) भांदवि. सहकलम 184 मोवाका. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गेडाम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक 02/09/2016 रोजी 16.00 ते 18.00 वा. दर. यातील आरोपी व फिर्यादी यांचे 3 महीण्या पासुन बोलाचाली बंद असुन फिर्यादी ही आपल्या घरी दरवाज्या समोर बसली असतांना तीला पाहुण आरोपीने फिर्यादीस लज्जेस धोका पोहचेल अशा शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. दुर्गा सखाराम निरगुडे वय 30 वर्ष, रा. दिघोरी/नानोरी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम 509,506 भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) दारुडया वाहन चालकावर कारवाई : . –**

दिनांक 03/09/2016 रोजी 16.15 वा. दर. यातील आरोपी मोटार सायकल क्र. एमएच 34 एएन 3651 च्या चालकाने आपल्या ताब्यातील मोसा. दारु पीवुन दारुचे नशेत बिना परवाना गाडी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिनव्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम 185(1),3/181 मोवाका.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) भांडण करून मारहाण केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक 04/09/2016 रोजी 20.00 वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी यांचे दुकान आमोरासमोर असुन फिर्यादी हा आरोपीच्या दुकाना समोरुन जात असतांना आरोपीतांनी जुण्या वादावरुन भांडण व संगनमत करुन फिर्यादीचे डोक्यावर, लाथाबुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादी अजय केशव रामटेके वय 50 वर्ष रा. हरदोली यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम 324,34 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

५) अज्ञात मोंटार सायकलवरील दोन इसमाने महीलेचे दागिने हिसकावुन नेले . :–

दिनांक 04/09/2016 रोजी 18.05 वा. दर. यातील फिर्यादी सौ. चंद्रकला महादेव गायधने वय 41 वर्ष रा. म्हाडा कॉलोनी भंडारा हे मोहल्या मध्ये हळदीकुंकु करीता रस्याने जात असता एका काळ्या रंगाची मोटार सायकल वरील अज्ञात दोन इसमांनी तीचे गळ्यातील 1 चपलाकंठी हार, ज्यात 2 सोन्याचे डोरले व 4 मोठे मनी असा एकुण 4 तोडे सोना कि. 60,000/–रु. चा जबरीने हिसकावुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम 392,34 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०४/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, वरठी, साकोली, लाखनी, लाखांदुर, व कारधा येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभंट्टी दारु कि. १,०००/–रू. व देशी दारू ११ लिटर ८८० मिली देशी दारू कि ४,३००/–रु. तसेच जुगारातुन ४,६००/–रू. कि. २,११०/–रू. चा माल असा एकुण किमती ६,४१०जप्त करण्यात आहे.

प्रभारी पोलीस अधिकारी भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.